






पूर्वेकडील काही रंग





डॉ. नीलिमा कुलकर्णी







ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

पूर्वेकडील काही रंग

(प्रवासवर्णन)

लेखिका : डॉ. नीलिमा कुलकर्णी

पूर्वेकडील काही रंग

हे पुस्तक विनामूल्य आहे

पण फ़ुकट नाही

हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन, मेसेज किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेसेज, मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

पूर्वेकडील काही रंग

लेखिका - डॉ. नीलिमा कुलकर्णी
Address - D/28, palm Acres Society, M. Phule Road, Mumund(E), Mumbai -400 081.
Phone - 09619911705.
Mail - drneelimakulkarni@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक: ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : १0 ऑगस्ट २०२३

©esahity Pratishthan®2023

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

डॉ. नीलिमा कुलकर्णी.



MSc; MSc; PhD; DHE; PGD in NGO managemant; successfully completed certificate course in translation skills (English-Marathi) by IIKEM, Thane, Maharashtra.

शैक्षणिक

1. स्टेट आणि नेशनल स्कॉलर
2. मुंबई येथील वझे महाविद्यालयातून, प्राणीशास्त्र - विभाग प्रमुख पदावरून २०१५ मध्ये निवृत्त
3. एक शिक्षक म्हणून ३९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (यु जी आणि पी जी स्तरावर)
4. मुंबई विद्यापीठातील प्राणीशास्त्र विषयातील पी एच डी मार्गदर्शक –
5. २ विद्यार्थ्यांना पी एच डी साठी, ३ विद्यार्थ्यांना पी जी प्रकल्पासाठी मार्गदर्शन तसेच अनेक विद्यार्थ्यांना यु जी प्रकल्पांसाठी मार्गदर्शन.
6. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि शोध निबंध वाचन
7. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय नियतकालिकात शोध निबंध प्रकाशित.
8. मुंबई विद्यापीठाच्या अनेक संशोधन प्रकल्पांमध्ये प्रकल्प प्रमुख किवा प्रकल्प सहाय्यक म्हणून सहभाग.
9. अनेक शैक्षणिक आणि कॉर्पोरेट आस्थापनात पर्यावरण विषयक भाषणं
10. 'हरियाली' या पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची - मुलुंड विभाग प्रमुख
11. प्राणीशास्त्र विषयातील ४ पुस्तके प्रकाशित
12. पर्यावरण क्षेत्रातील कामासाठी समाजसेवी पुरस्कार -२०१८, जेष्ठ नागरिक संघ, मुलुंड तर्फे


साहित्य

1. डॉ. अभिजित कुलकर्णी यांच्या एन बी टी ने प्रकशित केलेल्या दंतवैद्यकशास्त्रा संबंधित्त पुस्तकाचा अनुवाद, एन बी टी कडून प्रकाशित.
2. २००३ आणि २००५ मध्ये राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक .
3. ३५० च्या वर लेख प्रकाशित (मासिक, साप्ताहिक, दैनिक, अंक यातून)
4. ‘कुमारकोश’ साठी नोंदींचे लिखाण
5. ‘विश्वकोश’ साठी नोंदींचे लिखाण, प्राणीशास्त्र मंडळाची सभासद.
6. १९९५ पासून आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या ‘परिसर’, ‘ऐसी अक्षरे रसिके’, ‘चिंतन’, ‘झळा या लागल्या जीवा’, अशा कार्यक्रमांसाठी लेखन.
7. ‘आपलं पर्यावरण’ या मासिका साठी गेली १६ वर्ष लेखन.
8. ‘आपलं पर्यावरण’साठी ‘जीवजागर’ हे सदर.
9. ‘विवेक’ मध्ये प्रकाशित लेख आणि ‘जीवजागर’ हे सदर.
10. २०२०, २०२२, २०२३ मध्ये लोकसत्ताच्या ‘कुतूहल’ सदरासाठी लेखन
11. महाराष्ट्र टाईम्स च्या ‘इवोक’ साठी लेखन...(२०२३)
12. ‘मुलुंड नागरिक’ साठी लेखन.
13. ‘हरियाली’च्या विवध उपक्रमांच्या प्रसिध्धीसाठी केलेले लेखन..

डॉ. नीलिमा कुलकर्णी यांची ई साहित्यवर प्रकाशित दोन पुस्तके वाचण्यासाठी क्लिक करा

[प्रवासवर्णन (esahity.com)](#)





डॉ. नीलिमा कुलकर्णी यांची ई साहित्यवर 5 Audio पुस्तके ऐकण्यासाठी क्लिक करा

[ऑडिओ (esahity.com)](#)

पूर्वेकडील काही रंग

पूर्वेकडील काही देशात नवऱ्याला कामानिमित्त नेहमीच जावे लागते. या वर्षी माझा त्याच्या बरोबर जाण्याचा योग जुळून आला. म्हणतात ना – गाड्या बरोबर नळ्याची यात्रा.....

मुंबईहून, दिनांक ४ नोव्हेंबर २०१० रोजी रात्री आम्ही आमच्या - तैवान, जपान आणि सिंगापूर या क्रमाने - प्रवासाला निघालो. गेल्या २ वर्षांपासून मुले परदेशी गेल्यापासून परदेश प्रवासाची तयारी करणे हे माहितीचे झाले होते. फ्लाइट वेळेवर होती. विमान पण उत्तम.. आरामदायी होते. सिंगापूर एअरलाइन्सची सेवासुध्धा छान होती, माणसे तत्पर होती. सिंगापूरच्या वेळेनुसार सकाळी ८:२० मिनिटांनी आम्ही 'चांगी' विमानतळावर उतरलो. अस्वच्छते कडून स्वच्छते कडे, गर्दीतून तुरळकते कडे, आणि गरीबीकडून समृद्धीकडे असा प्रवास आता काही दिवस तरी होणार होता. चांगी विमानतळ स्वच्छ, नेटका, मोठा आणि सुखदायक असा आहे. आम्हाला येथे ४ तास थांबायचे होते पण वेळ कसा गेला ते कळलेच नाही. नियमाला धरून चालणारी माणसं, सगळीकडे स्वच्छता, सर्व गोष्टींची

उपलब्धता आणि कमालीचे प्रसन्न वातावरण या मुळेच असावे ते.... ड्यूटी फ्री मध्ये फिरलो, खिशाला परवडेल आणि गरज असेल अशी खरेदी केली. येथे सर्वांनाच इंग्रजी कळते त्यामुळे भाषेचा प्रश्न येत नाही. मुंबई विमानतळावर आम्हाला सुनील बर्वे, वैभव इंगळे, मृण्मई देशपांडे हे दिसले. आम्ही त्यांच्याशी जुजबी बोललो, म्हणजे त्यांनी आमच्याशी हसून उत्तरे दिली, आमचे आवडते कलाकार ... छान वाटले. अजून ते तसे साधेच वाटले. आमची फ्लाइट १२:१५ ला सिंगापूरहून तैवानकडे निघाली. ४ तास आणि २० मिनिटांचा प्रवास करून आम्ही तैवान च्या " Taayoun" 'तैयुआन' की काहीसे असावे – विमानतळावर पोचलो. सिंगापूर आणि तैवान यांच्या वेळेत फरक नाही. संध्याकाळचे ६: २० वाजले होते. बाहेर आलो तर टॅक्सी ड्राइव्हर आमच्या नावाचा बोर्ड घेऊन उभाच होता. आता येथे मात्र भाषेचा प्रश्न सुरू झाला होता पण चीन मध्ये अनुभवले तितके वाईट नव्हते. थोडे फार हाँगकाँगशी साम्य वाटत होते.

बाहेर येते वेळी थोडा गोंधळ झाला. आमच्या व्हीसावरील आणि तैवान व्हीसाचा संदर्भ नंबर यामध्ये फरक होता. त्यामुळे आम्हाला बाजूला उभे राहण्यास सांगितले नम्रपणे... दादागिरीची भाषा नाही, कसलाही संशय नाही आणि वर तो ऑफिसर 'नो प्रॉब्लेम' असे आम्हाला सांगत होता. ४-५ फ्लाइट्स एकदम आल्यामुळे जरा गर्दी झाली होती, परंतु सगळे शिस्तीत सुरू होते. कोठेही गडबड गोंधळ नाही, रांगेत घुसणे नाही अथवा कोणावर खेकसणे नाही. काही वेळातच त्यांच्या शंकेचे निरसन झाले. त्या ४००-५०० लोकांमध्ये आम्ही तेव्हढे वेगळे दिसत होतो. बाकी सगळे थोड्याफार फरकाने गोरे, बसक्या नाकाचे, मिचमिचणाऱ्या डोळयांचे अंगाने शिडशिडित असेच ... आमच्या टॅक्सीड्राईव्हरचे इंग्रजी तसे यथातथाच , त्यामुळे त्याच्याशी संवाद साधणे तसे कठीणच. परंतु त्याला सत्यसाईबाबा मात्र माहीत होते. त्याच्या माहितीनुसार साईबाबा हे गौतम बुद्धाचे अवतार .....आमच्या ज्ञानात भर पडत होती. तो इंग्रजी बोलण्याचा प्रयत्न करीत होता पण त्याच्याकडे शब्दांचाच तुटवडा, त्याला तो तरी काय करणार बिचारा .....

फ्रिवे ने टॅक्सीला ५० मिनिटे लागली. हॉटेलला पोचलो. नाव होते 'रिव्हर व्हयू'. माणसांची वर्दळ होती, हॉटेल खूप चांगले होते. नेटची केबल, कार्ड किल्ली वगेरे घेऊन आम्ही आमच्या १० व्या मजल्यावरील खोलीकडे निघालो. तैवान मध्ये ताऊ धर्माची माणसे सर्वात जास्त, त्यानंतर बौध्द धर्माची तर मुस्लीम अगदी कमी. त्यांची भाषा मॅनड्रीन. तैवान आता बऱ्याच अंशी स्वतंत्र आहे. राजकारणात, आस्थापनात चीनचा हस्तक्षेप आता कमी आहे पण तरीही तैवान या नावाबरोबर आर. ओ. सी. – 'रिपब्लिक ऑफ चायना' असेच लिहिले जाते. एलेक्ट्रोनिक मार्केट खूप मोठे, गोष्टी स्वस्त, टॅक्सी भाडे आपल्या सारखेच त्यामुळे आम्ही ही आनंदात. सामान रूमवर ठेवले, चहा घेतला आणि चक्कर टाकायला निघालो. आमच्या हॉटेल जवळील मार्केट आणि स्टेशनचे नाव होते 'झिमेन'. तर जवळच्या एम आर टी स्टेशन चे नाव ' मोव'. दानशू नावाच्या नदीकाठी आमचे हॉटेल होते. 'शोंग झिंग' ब्रिजने आम्ही 'तायपे' मध्ये आलो.



हॉटेल रीवर व्ह्यू



पुलांचे जाळे

तैवान चे १० भाग आहेत. ताईपे हा त्यातील उत्तरेकडील भाग आणि तैवानची राजधानी. बाकीची मोठी शहरे म्हणजे काहोशिउंग, तैचुंग, तैनान, तौयुअन वगैरे. आमचे साईट सीइंग आम्ही तायपे मध्येच करणार होतो. रात्री बरोबर घेतलेले मेथीचे थेपले खाल्ले आणि झोपलो. निघाल्या पासून आता २४ तास झाले होते. झोपेची फार गरज होती. दुसऱ्या दिवशी ब्रेकफास्ट करून टॅक्सीने निघालो कंपनीच्या ऑफिस मध्ये . टॅक्सी ड्राईव्हरला कळावे म्हणून चाईनीज भाषेत लिहिलेला पत्ता आम्ही बरोबर घेतला होता. त्यामुळे त्याने बरोबर ठिकाणी आणून सोडले. ऑफिसची मिटिंग झाली आणि आम्ही हॉटेलवर परतलो. हवा छान थंड होती, पावसाची रिमझिम सुरू होती. मध्ये थोडा वेळ होता म्हणून आम्ही परत बाहेर पडलो. बाजार नुसता फुललेला होता. रस्ते सगळे सारखे, गर्दी पण खूप होती... खाण्यासाठी काही वस्तु विकत घेतल्या... भज्यांसारखे होते काहीतरी, पण चव छान होती.... खाऊन निघालो टॅक्सी करून दुसऱ्या मिटींगला गेलो... ही मीटिंग पण छान झाली. मी सुध्धा मिटिंगमध्ये उपस्थित रहात होते. संध्याकाळी डिनरला जायचे होते. मीटिंग ५ वाजता संपवून आम्ही हॉटेलवर आलो आणि आम्हाला ७ वाजता कोणीतरी न्यायला येणार असे ठरले.

आम्ही ७ वाजता खाली आलो तर गाडी हजरच होती. त्या माणसाच्या एका मित्राचे हॉटेल होते. सर्व डीशेसमध्ये फळांचा वापर मुबलक होता.

फळांची सजावट पण सुंदर होती. सॅलड, सूप, सुशी, फिश असे सगळे आम्ही खाल्ले. डिश मधील प्रेझेंटेशन पण फार छान होते. आम्ही त्याचे फोटोसुध्धा काढले. त्याच भागात एकेकाळी जगातील सर्वात उंच इमारत 'तैवान १०१' ही होती. आता तिचा नंबर २ रा लागतो. त्यावर दिव्यांची सुंदर आरास केली होती. खूप छान दिसत होती. त्याच्या ८० व्या मजल्या पर्यन्त पर्यटकांना जायला परवानगी आहे. त्याचे तिकीट होते ४०० तैवानी डॉलर्स...त्यामुळे आम्ही तो प्लान घेतला नाही. त्या हॉटेल मध्ये मित्र, त्याची बायको स्वतः जातीने काम पाहत होते. अगदी ऑर्डर घेण्यापासून ते पदार्थ आणून देण्यापर्यन्त. या देशामध्ये माणसे सतत काही ना काही काम करत असतात. जेवण संपवून आम्ही निघालो ऑफिस मधील मित्राने आम्हाला हॉटेलवर सोडले. तोपर्यंत रात्रीचे ९:३० वाजले होते. जेवण आणि गप्पा छान झाल्या. एरवी नेहमीच्या रुटीन मध्ये अशा गप्पा होत नाहीत.

दुसरे दिवशी शनिवार होता. आम्हाला प्रेक्षणीय स्थळे पाहायची होती. मुलाच्या मैत्रिणीने पाठविलेली महत्वाच्या ठिकाणांची माहिती एम टी आरच्या मॅप वर बघून कुठे कुठे जायचे ते ठरविले. सुरूवातीला आम्ही अर्ध्या दिवसाची टूर करायचे ठरविले, ९०० तैवानी डॉलर्स तिकीट होते, त्याला पण हरकत नव्हती, परंतु ती टूर होती फक्त ३ तासांची. आम्हाला, एम टी आरचा दिवसभराचा पास काढून वेगवेगळ्या ठिकाणी फिरणं जास्त चांगलं झालं असतं असे वाटले. पैसेही थोडे वाचले असते आणि आम्हाला जागा जास्त चांगल्या कळल्या असत्या. प्रत्यक्ष सार्वजनिक वाहतुकीचा वापर केला म्हणजे नवीन जागेचा अनुभव नेहमीच जास्त चांगला येतो हे खरेच. सकाळी जरा उशिरा उठलो. ब्रेकफास्ट घेऊन बाहेर पडायचे ठरविले. परंतु नेमकी माझ्या पाठीत सकाळी उसण भरली. हळूहळू चालत आम्ही जवळच्या झीमान स्टेशनवर आलो. स्टेशनचा आढावा कालच घेतला होता. आमचा २०० डॉलरचा डे पास होता. इंग्लंड प्रमाणे ही मेट्रोपण खूप छान आहे. सगळीकडे व्यवस्थित साईन बोर्ड त्यामुळे कुठे गोंधळण्याचे कारणच नाही. झीमानहून आम्ही ब्ल्यु लाइनने तायपे मेन स्टेशनवर गेलो. तेथून एक स्टेशन प्रवास करून ‘झिबेन्टाउ’ या ठिकाणी गेलो. तेथे गरम पाण्याचे झरे आहेत.

कोणत्याही स्टेशनच्या बाहेर पडण्याच्या दाराजवळच त्या ठिकाणाचा संपूर्ण नकाशा असे. काउंटरवर सुध्धा सगळी माहिती मिळणार. तैवान सारख्या लहान देशात सुध्दा या सोई होत्या. त्याच्या बरोबरीने स्वच्छता सुध्धा होती. अर्थात गावातून फिरतांना काही भागात छोटी दुकानं, टपऱ्या, माणसं आपल्या सारखीच होती. एकूण तैवानी माणूस मदत करणारा वाटला. इंग्रजी येत नसे पण मदत करण्याची इच्छा असे आणि तो जमेल तसा प्रयत्नही करत असे. ग्रीन सल्फर हॉटस्प्रिंग्स मस्त होत्या. गंधकयुक्त पाणी, पाण्याचे तापमान ९० ते १०० डिग्री ......वाफा निघणारं...काही ठिकाणी उकळणारं ..... पण सुरक्षा तेव्हढीच... सगळीकडे चांगल्या स्थितीतील लोखंडी कठडे तसेच सूचना व्यवस्थित लिहीलेल्या...



बेटाउ थर्मल व्हेली - ग्रीन सल्फर हॉटस्प्रिंग्



गरम पाण्याच्या कुंडाकडे जाण्याचा सुरक्षित रस्ता

हे सगळं पाहतांना मला मुंबई जवळच्या वज्रेश्वरी येथील गरम पाण्याच्या कुंडांची आठवण झाली. तेथील मदत करणारी माणसं तशीच पण कुंडांच्या जवळची अस्वच्छता अस्वस्थ करणारी. असो... तेथून आम्ही एक चीनी मंदिर पाहायला गेलो. सगळीकडे चालतच जायचे होते. देऊळ फारसे मोठे नव्हते पण त्यात आपल्या देवी सारखी देवी होती. तिला अनेक हात होते.



देवी सदृश्य मूर्ती असलेले देऊळ

बाकी तिथे लिहिलेले काही कळले नाही.. जवळच्या माणसाला विचारावे म्हटले तर त्याला इंग्रजीचा गंध नव्हता. राइट,लेफ्ट, अप, डाउन यासारखे साधे इंग्रजी शब्दपण त्यांना कळत नव्हते. काही वेळा अगदी हतबल झाल्यासारखे वाटत होते. आम्ही ट्रेन पकडून दानशुई येथे गेलो. हे होते रेड लाइन वरील शेवटचे स्टेशन. त्या जागी फिशरमन वार्फ पाहायचा होता. दानशुई स्टेशन बाहेरून २६ नंबरची बस पकडून आम्ही वार्फला पोहोचलो. आता आम्ही थोडे दमलो पण होतो. तेथे एक माणूस १० मिनिटात तुमचे स्केच काढून देत होता १०० तैवानी डॉलर्स मध्ये. बरेच जण काढून घेत होते. वार्फ मस्त होता, छान हवा, समुद्र, आणि नेत्रसुख...



फिशरमन वार्फ

हिंडून झाल्यावर आम्ही पुन्हा दानसुईला आलो. शनिवार असल्याने गर्दी कमी होती. अधून मधून रिमझिम पाऊस सुरू होता. आमच्याकडे जॅकेट्स होती. तशी थंडी नव्हती पण हवा छान होती. येथे सर्व जण थंडी नसली तरी स्वेटर वगेरे काहीतरी घालतातच .... खाली छोटीशी विजार अथवा स्कर्ट, पण वर स्वेटर पाहिजेच.... बायका सगळ्या चटपटीत, सडपातळ. पुरुषांपेक्षा बायका जास्त काम करतांना दिसतात. वार्फहून परततांना आम्ही एक अंतरराष्ट्रीय प्रदर्शन होते, फुलांचे – तेथे गेलो. खरं म्हणजे कंटाळलो होतो. आत नाही गेलो कारण तिकीट होते २५००० तैवानी डॉलर्स.....खूप मोठे प्रदर्शन होते ते. त्याच दिवशी उद्घाटन झाले होते त्या निमित्ताने फायर वर्क होते... आमचे हॉटेल रिव्हर व्हयू अगदी नदी किनारी, पण आमची खोली नदीच्या बाजूला नसल्याने आम्हाला ते फायरवर्क पाहता आले नाही आणि ब्रेकफास्ट लाउंज मधून ते पाहण्यासाठी हॉटेलवाल्याने तिकीट ठेवले होते. तायपे मेन ला येऊन झीमानला आलो तेथून जवळच ‘लोंग हान’ नावाचे आणखी एक चीनी देऊळ पाहायला गेलो.



‘लोंग होन’देऊळ

मोठ्या मोठ्या उदबत्त्या घेऊन माणसं त्या लावत होती. एका झाडाला बांधलेले धागे म्हणजे स्वतःची इच्छा पूर्ण होण्यासाठी लोकं असे धागे बांधत होती. तेथून आम्ही टुरिस्ट मार्केटमध्ये गेलो. रमत गमत हिंडलो, तेथून आमचे हॉटेल जवळच होते. थोडेफार खाऊन, वस्तु पहात पहात हॉटेल वर परतलो. खूप दमायला झाले होते पण ठरविलेले सर्व पाहून झाले होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे ७ नोव्हेंबर ला सावकाश उठलो. मी गरम पाण्याचा शेक घेतला. गरम शॉवर ने खूप बरे वाटते. ३०% दुखणं उरलं. ब्रेकफास्ट करून निघालो. झीमानहून रेड लाइन ने ‘शिलीन’ ला आलो. आज म्युझियम पहायचे होते. एव्हढे खास नाही वाटले. तेथे बराचसा चीनी इतिहास होता..... बसने पुन्हा ताईपे १०१ ला जाण्याचे ठरवले पण मग कंटाळा आला आणि थेट हॉटेलवरच आलो.

काल अर्धा दिवस संपता संपता पास कुठेतरी पडला. त्यामुळे नवीन घ्यावा लागला तरीही तो खूपच सोईस्कर आणि कमी खर्चाचा वाटला. पासच्या मागे काही सूचना होत्या, त्या वाचल्या, त्यानुसार २०० पैकी ५० डॉलर ही अनामत रक्कम होती. आम्ही डे कार्ड परत केली, प्रत्येकी ५० म्हणजे १०० डॉलर्स परत मिळाले. संध्याकाळी बाजारात हिंडलो, थोडी खरेदी केली आणि मग आराम केला. रात्री खाखरे आणि कॉफी असा बेत केला. उद्या ८ तारखेला येथून निघायचे होते. रात्रीच बील वगैरे दिले. सकाळी ७:३० ला टॅक्सीने तैवान एयरपोर्टवर पोचलो. छान आहे एयरपोर्ट. स्वच्छ आणि सर्व सुखसोईंनी युक्त. तैवान तसा प्रगत देश वाटतो. असो. युनायटेडची फ्लाइट तशी ठीकठाकच होती. विमान खूप मोठे होते, पण खाणे ठिकठिकच...... दुपारी २:३० (लोकल टाइम) ला जपानच्या नरिटा एयर पोर्टला पोचलो.




नारिता एयरपोर्ट

नरिटा एक्स्प्रेसने टोकयोला पोचलो आणि टॅक्सीने हॉटेल वर. 'व्हिला फाऊंटेन' असे हॉटेलचे नाव होते. समृध्द देश, प्रगत देश म्हणजे काय ते पावलोपावली दिसत होते, जाणवत होते. जपान महागही तितकेच होते. ३:४५ ची एक्स्प्रेस पकडून, टक्सी करून ५:०० ला हॉटेल वर पोचलो. हॉटेल तारांकित होते. एकदम मस्त होते. ६:०० वाजता एका तिथल्याच स्थानिक माणसाला भेटायचे होते. आम्ही चालतच जवळच्या एका हॉटेल मध्ये जेवायला गेलो. त्यांनीच पदार्थांची निवड केली, अगदी बरोबर, आम्हाला खाण्यास जमेल आणि आवडतील असे पदार्थ ..... जेवण आणि गप्पा उरकून आम्ही ८:३० ला हॉटेलवर आलो. त्या खूप महागड्या आणि राजेशाही हॉटेल मध्ये शांत झोपलो.



हॉटेलची लॉबी



खोलीतून दिसणारे दृश्य

दुसऱ्या दिवशी आम्हाला सकाळी ९:०० वाजता एकजण नेण्यास येणार होता. आम्ही ब्रेकफास्ट करून तयार होतो. सामान घेऊन त्यांची वाट पहात लाउंजमध्ये बसलो होतो. सर्वच स्टार हॉटेल्स मध्ये ब्रेकफास्ट इतका असतो की दुपारी २-३ वाजेपर्यन्त फारशी भूक लागत नाही. आम्ही टॅक्सीने टोकयो ऑफिस मध्ये गेलो अर्थात सामान घेऊनच.... माझी सर्वांशी ओळख करून दिली. त्यांच्या मीटिंग दरम्यान मी तेथेच बसले होते, त्यांच्या परवानगीनेच अर्थात..... आम्ही तेथे पोचल्या पोचल्या भारतातून नेलेल्या गिफ्ट्स वगैरे दिल्या. मीटिंगची सुरुवात ११:३० ला झाली. जेवणासाठी बॉक्स दिला सर्वांना.... ते दोघे जपानी तर बरोबर १५ मिनिटात जेवण उरकून तयार. खूप आणि सतत काम करतात जपानी लोक.....मीटिंग चांगली झाली. त्या जेवणाच्या बॉक्सचा फोटो काढून ठेवला मी. पदार्थ इतक्या सुंदर रीतीने ठेवले होते त्यात....

जेवणाचा बॉक्स



पण मला त्याची चव फारशी आवडत नव्हती, असो....आता आम्ही निघालो आमच्या पुढील प्रवासासाठी.. सर्व सामान घेऊन, ट्रेनने. आम्ही जाणार होतो हडानोला. हडानो हे जपानच्या कानगावा प्रांतातील एक शहर आहे. हडानो हे तंबाखूच्या व्यापारासाठी प्रसिद्ध असे ठिकाण. तेथील मेनेजर आमच्या बरोबर होते .... सामान उचलून नेण्यात त्यांनीही मदत केली. ते आम्हाला स्टेशनवर सोडायला आले होते. एथे सर्व जण सार्वजनिक वाहतुकीचाच वापर करतात, नाहीतर चालत जातात. २ ट्रेन बदलून आम्ही हडानोला पोचलो. स्टेशनच्या बाहेरच आमचे हॉटेल होते. हॉटेल 'ग्रँड कानाचू'. हे हॉटेल सुध्धा उत्तम होते. मी हॉटेलवर थांबले आणि ते दोघे फॅक्टरी विझीटसाठी गेले. मला आता ५ वाजेपर्यंत वेळ होता. मी आराम केला, थोडे लिहिले, खाल्ले, झोपले...... हडानो सगळीकडून पर्वतांनी वेढलेले गाव आहे. स्वच्छ आणि थंड हवा... खिडकीतून होणारे बर्फाच्छादित 'फुजियामा' चे दर्शन......... अर्थात वरून शांत दिसणारा फूजीयामा. ....



हडानो

फुजीयामा चे दर्शन



संध्याकाळी ६ वाजता तेथील ऑफिसच्या मेनेजरने आम्हाला रात्रीच्या जेवणाचे निमंत्रण दिले होते. त्यामुळे थोडा वेळ आराम करून ६ वाजता खालीच होटेलच्या लाउंजमध्ये येऊन थांबलो. तो बरोबर ६ वाजता आला. आम्ही तेथूनच जवळच असलेल्या एका हॉटेल मध्ये गेलो. तेथे भारतीय बैठक – म्हणजे जपानी लोकांची मूळ पध्ध्त पण थोडा बदल करून – जमिनीवर बसणे आणि खुर्चीवर बसणे याचा मध्य गाठला होता. म्हणजे असे की खाली बसतांना मांडी न घालता पाय मोकळे सोडायला जागा. एकदम सोयीचे. समोर नेहमीसारखे टेबल. हॉटेल छान होते, जेवण पण चांगले होते. शिंपले, स्नेल्स, मशरूम, टुना मासा, प्रौन्स - असे बरेच काय काय खाल्ले. जपानी डिशची सजावट खूप छान असते. येथील जपानी मुळयांचा कीस आणि त्याबरोबर आमलेट. जपानी वीड्सचे लोणचे आणि आपल्याकडील तेमरीन राईस सारखा एक भात. त्या भल्या माणसाने आम्हाला खाण्यास जमेल आणि आवडेल असेच पदार्थ ऑर्डर केले होते. ८: ३० ला जेवण संपवून आम्ही हॉटेलवर आलो. उद्या पुन्हा सकाळी ९:३० वाजता आम्हाला नेण्यास ते येणार होते. जसे काही आमच्या सेवेत होते ते. हा त्यांचा चांगुलपणा. खरे तर तेथील एका डिविजन चे मुख्य होते ते – पण आदरातिथ्य इतके कि विचारू नका........... हडानो चे हे ग्रँड हॉटेल चांगले होते. गजर लावून झोपलो. मी. मेनेजर असतील ५२-५५ वयाचे .... साधे आणि

गरीब स्वभावाचे . खूप तल्लख नाही पण खूप चांगला माणूस. आम्हाला मदत तर करत होतेच पण आमची काळजी पण घेत होते. एरवी जपान मध्ये एकट्याने – अगदी नकाशा घेऊन सुध्धा फिरणे महाकठीण. भाषेचा मोठा प्रश्न . येथे माणसांना इंग्रजी अजिबात कळत नाही. माणसं चांगली, मदतीला तयार, पण त्यांना भाषाच कळत नाही त्याला ते तरी काय करणार? एकूण काय, जपानी भाषेचे ज्ञान नसतांना एकट्याने जपान मध्ये हिंडणे महाकठिण – इंग्रजी शब्द, अक्षरे, स्टेशनची नावे जपानी भाषेत लिहून घेतल्याशिवाय आपण काय विचारतोय हे कोणाला कळतच नाही. असो,

१० नोव्हेम्बर च्या सकाळी आम्ही हॉटेल 'व्हिलाफाऊंटेन' सोडले. टॅक्सी करून कंपनीच्या फॅक्टरी वर आलो. आपल्याकडे असते तशी फॅक्टरी नाही. इथली फॅक्टरी म्हणजे स्वच्छ, नेटकी, एखादे ऑफिस वाटावे अशी – ऑफीसच्या दारातच 'वेल कम' अशी पाटी पाहून छान वाटले. "तुमच्या कंपनीचे जपान मध्ये स्वागत आहे" हे वाचून मस्त वाटले. जसे इंग्लंडमध्ये डेंटल प्रॅक्टीसच्या बाहेर मुलाचे नाव पाहून वाटले होते तसेच ... अभिमान वाटला दोन्ही वेळेला. तेथील एका डिविजनचा मॅनेजर आणि आम्ही एका कॉन्फरन्स रूम मध्ये बसलो. भारतातून नेलेल्या गिफ्ट्स वगेरे दिल्या. १० च्या ठोक्याला मीटिंग सुरू झाली. त्यांच्या परवानगीने मी पण तेथेच बसले होते,


एक पुस्तक वाचत.... माहितीची देवाणघेवाण सुरु होती. सर्वजण प्रभावित होते. १२ वाजता जेवणाचा ब्रेक घेतला. छान पॅक आणि सुंदर प्रेझेंट केलेले जेवण घेतले आणि पुन्हा चर्चेला सुरुवात झाली. एकूण मीटिंग छान झाली. ४:३० च्या सुमारास तेथून निघालो. टॅक्सी करून हडानो स्टेशनवर गेलो. मॅनेजरने स्वतः आमची बॅग उचलून गाडीत टाकली. शिष्टाचाराचा भाग असला तरी सर्व जण खूप खुश होते. माझा खरे म्हणजे कशाशीच संबंध नव्हता. २-३ ठिकाणी गाड्या बदलून आम्ही हकोनेकडे कूच करीत होतो. ५:३०-६:०० लाच अंधार झाला होता. आम्ही कसे आणि कुठे चाललो होतो हे फक्त त्या मेनेजरलाच ठाऊक होते. डोंगरावर घाटाचा रस्ता होता. गाडी रिकामी होती आणि गम्मत म्हणजे गाडी पुढे जाऊन पुन्हा एक स्टेशन मागे यायची. नागमोडी रस्ता, बाहेर अंधार आणि पुढे मागे होणारी आमची गाडी. अखेर आम्ही पाउणे सात वाजता स्टेशन वर उतरलो. एक गोष्ट मात्र नक्की ती म्हणजे परदेशात अनोळख्या ठिकाणी सुध्धा भीती वाटत नाही. आणि जरी वाटली तरी ती फक्त आपल्या बाजूने असते. मदत नेहमीच हाकेच्या अंतरावर असणार हा विश्वास वाटतो आणि ती खरी मदत असते. असो, ‘कोवाकिडानी’ हे स्टेशनचे नाव.



कोवाकीडानी स्थानक

आकडे सोडले तर खालील तक्त्यातील कशाचातरी अर्थ कळतोय का पहा....

स्थानकातील फलक



तेथून आम्ही टॅक्सी बोलावून टॅक्सीने ‘कोवकीडुन’ या हॉटेलवर आलो. एकदम स्टार हॉटेल, खूपच छान होते.


हॉटेलच्या ‘स्टार्स’ चे थोडे दडपण आलेच... मेनेजर आज हकोनेला राहून दुसऱ्या दिवशी आम्हाला सोडून परस्पर ऑफीसला जाणार होते. आम्ही रूम वर गेलो आणि ७:३० वाजता लाउंज मध्ये भेटायचे ठरले. जपान मध्ये टॉयलेटची सीट उबदार असते आणि स्प्रे गरम पाण्याचे असतात. अर्थात गरम आणि थंड. सुरूवातीला थोडे वेगळे वाटले पण ते सोयीचे होते हे नक्की. योग्य ठिकाणी पोचणारे पाण्याचे फवारे.... गम्मतच वाटते. जपानी लोक काय करतील सांगता येत नाही. आणि माझा तो पहिलाच अनुभव होता इतकेच.. हकोने हे कानागावा विभागातील एक ठिकाण डोंगरांनी वेढलेले ठिकाण आहे. त्यातील छोटे छोटे भाग, केबल कार, रोप वे आणि पाणी या मार्गाने जोडलेले आहेत. ही जागा गरम पाण्याच्या झऱ्यांसाठी प्रसिध्ध आहे. इथे थंडीही चांगलीच होती. मस्त ठिकाण होते.


10 11 2010 09 00
हकोने

आज पण त्यांनी ऑर्डर केलेल्या सर्व गोष्टी मस्त होत्या. आमच्या प्रत्येकासाठी वेगळा गॅस स्टोव्ह , जो २० मिनिटे सुरू असणार- त्यावर भात शिजत लावलेला- २५ मिनिटांनी तो खायचा. भात होईपर्यंत इतर गोष्टी खायच्या. भातात सर्व काही घालून , हवे तेव्हढे पाणी घालून वेट्रेस गॅस लावून गेली सुध्धा. जपानी ड्रेस मधील ती मुलगी छान दिसत होती.. मी हे प्रथमच बघत होते. जेवण छान होते. दुसऱ्या दिवशी म्हणजे सकाळी ७:३० वाजता ब्रेक फास्ट घेऊन निघायचे होते. या हॉटेल मध्ये खूप म्हातारी माणसे दिसत होती. सर्व जपानीच होते, आमच्या सारखे कोणीच नव्हते. येथील टॉयलेट ची खूण म्हणजे हॅट आणि कॅप..... पटकन फरक कळणे कठीणच. उभी हॅट असेल तर पुरुषांसाठी आणि बसकी कॅप असेल तर महिलांसाठी. हडानोहून निघतांना ३ च्या २ बॅगा केल्या होत्या. काही गोष्टी पोस्टाने पाठविण्यासाठी संगितले होते. ते खूप बरे झाले. आम्ही ८:३० वाजता बाहेर पडलो. मेनेजर आम्हाला ‘गोरा’ या स्टेशनपर्यंत सोडून पुढे ऑफीसला जाणार होते. हकोनेच्या साईट सिईंग साठी आम्ही २ दिवसांचा पास काढायचे ठरविले. एकदा पास काढला की कोणत्याही मार्गाने कितीदाही प्रवास करता येतो. थंडी चांगलीच होती. स्वेटर, कानटोप्या होत्याच. हॉटेल समोरूनच

'गोरा' साठी बस पकडली. तेथून आम्हाला केबल कार घेऊन सौञ्झेनहून रोप वे ने "ओवाकुडानी" ला जायचे होते. त्यांना बाय करून निघालो, म्हणजे तो निघाला. येथे नकाशे आहेत, बोर्ड आहेत पण भाषेच्या प्रश्नामुळे एकट्याने प्रवास खूप अवघड आणि वेळखाऊ. सूचना पण सगळया जपानी भाषेत. इंग्रजी सूचना नावापुरत्याच आणि वाचता न येणाऱ्या. ओवाकुडनीला पोचताच फूजीचे दर्शन जास्त जवळून व्हायला लागले. रोप वे ने जातांना खाली नजर टाकली तर अनेक ज्वालामुखी धूर सोडताना दिसत होते. पृथ्वीच्या पोटातील धुमसणारी आगच ती !! येथे निद्रिस्त असलेला ज्वालामुखी जवळ जाऊन पाहता येतो. गरम वाफा, उकळते पाणी आणि सल्फरचा वास, गम्मत म्हणजे तेथे त्या पाण्यात अंडी उकडून मिळत होती. सल्फारचा उग्र असा वास सगळीकडे पसरला होता. परंतु सुरक्षा , रेलिंग, रक्षक, ही व्यवस्था मात्र चोख!! आम्ही साधारण ३००० फुटांवर होतो. फूजीचे दर्शन आता छान होत होते.

‘रोप वे’ ने जातांना दिसणारे दृश्य





त्याच्यावरील बर्फ आणि इतर पर्वतांच्या रांगा....तेथे थोडा वेळ थांबून आम्ही रोप वे ने "तोगेंडोई" या ठिकाणी गेलो. तेथे एक मोठा तलाव आहे. "लेक अशी" असे त्याचे नाव. हकोने येथील हा अतिशय सुंदर असा दक्षिण पश्चिम असा पसरलेला क्रेटर लेक (कुंड सरोवर) आहे. याला 'हकोने लेक' असेही म्हणतात. येथून पुन्हा एकदा फुजीचे दर्शन झाले. आमच्या पासमुळे आम्हाला पटकन कोठेही जाता येत होते. लेकवरचा क्रूझ आमच्या पासात समाविष्ट होता ३० मिनिटाचा क्रूझ. काहीतरी भराभर बोलून घोषणा झाली पण आम्हाला त्यातले काहीच कळले नाही. आम्ही तळयाच्या दुसऱ्या टोकाला म्हणजे "हकानोमची" येथे उतरलो. नकाशाप्रमाणे आम्ही तेथे एक फुलांचे प्रदर्शन आणि 'एंशंट सेदार अवेन्यू' ही पाहिले. ओब्झेर्वेशन पॉइंट वरुन तळयाचे दर्शन घेतले, काहीतरी खाल्ले आणि "मोतोहकोने" ला आलो.



लेक 'अशी वरील क्रुझ



लेक 'अशी'

हा भाग जरा वर्दळीचा होता परंतु कुठे जायचे ती दिशा कळत नव्हती. तिथे फिरलो आणि “हकोने टोझान” ची बस पकडली. थोडे पुढे जाऊन मागे आलो. पास झिंदाबाद !! “मोतोहकोने” हून बस पकडून साधारण दुपारी ३:३० च्या सुमारास हॉटेलला परतलो. दमलो होतो आणि खाण्याचे फारसे काही जुळत नव्हते, जमत नव्हते. काय खावे तेही कळत नव्हते. ‘मोटोहकोने’ हून आम्ही पाव आणला होता. बाकी आम्हाला आवडेल, समजेल, असे काही इथे मिळतच नव्हते. ६ वाजताच अंधार झाला.. आता उद्याचे वेध.... सगळे सामान घेऊन निघायचे म्हणजे धसकाच... प्रत्येक ठिकाणी ओफिसच्या लोकांनी आमचे दोघांचेही चांगले आदरातिथ्य केले.... पण हिंडण्या फिरण्यातील सुटसुटीतपणा आता थोडा कमी झाला की काय असे वाटते. आता दमायला होते, कुठेतरी बसावेसे वाटते आणि मुळात थोडे दिवसातच घरी परतावेसे वाटते. येथे सगळीकडेच दिसणारी ‘मेपल’ ची झाडे तेथील सौंदर्यात भर घालतात.

१२ तारखेला सकाळीच हकोनेला ‘बाय’ करून निघालो. लवकर ब्रेकफास्ट घेऊन ८ वाजता बस ने ‘गोरा’ स्टेशन गाठले. तेथून ‘यूमोटो’ ने ओडावराला आलो. तेथून ‘‘सिञ्झूकू’’, जे मध्यवर्ती स्टेशन होते आपल्या दादर सारखे, तिथे पोचलो. सिञ्झूकू पासून शिंबाशीची ट्रेन पकडली. तोवर ११:३० वाजत आले होते. आमच्या अंदाजाप्रमाणे आमची टोकयोची साईट सिईंग साठीची बस १२ किवा १ वाजताची असणार होती. मेनेजर आमचे तिकीट काढून ठेवणार होते . गम्मत म्हणजे शिंबाशी स्टेशनबाहेर पडून आम्हाला विलाफोंटेन हॉटेलला जायचे होते. हॉटेल जवळच होते पण आम्ही उलट्या दिशेने गेलो आणि चांगलाच गोंधळ झाला. कोणाला विचारण्यातही अर्थ नव्हता. एकतर आमच्या बरोबर सामान होते आणि दिशाभूल होत होती. माणसं मदत करायला तयार होती पण त्यांना फक्त जपानी भाषा येत होती आणि आम्हाला तीच येत नव्हती. फेडेक्सच्या ऑफीसवाल्याने आम्हाला हॉटेल कुठे आहे ते दाखविणारे एक कलर प्रिंट काढून दिले. तरीही आम्हाला त्या चक्रव्यूहातून बाहेर पडणे जमत नव्हते. अखेर आम्हाला तो ओळखीचा जिना दिसला. हे म्हणजे पू. लं. च्या पार्ल्याच्या मावशीचे घर शोधण्यासारखे झाले.

होटेलच्या रिसेप्शनला येईपर्यन्त १२:३० वाजले. गम्मत म्हणजे मेनेजर आमची वाट पाहत थांबले होते. सामान ठेवले, आमची तिकिटे घेतली आणि आम्ही टोकयो पाहायला निघालो. आमची बस १:४० ची होती. त्यांनी आम्हाला बस स्टॉपला सोडले आणि ते ऑफिसला गेले. आम्ही थोडेफार खाण्याचे घेतले होते. जवळच बँक शोधली, पैसे घेतले आणि बसच्या पीकअप साठी उभे राहिलो. बस वेळेवर निघाली. बस छान होती आणि त्याहून छान होता आमचा गाईड. ‘कूनेको’ त्याचे नाव. इतकं मन लावून काम करत होता की बस! अगदी बसचा २६२ नंबरचा झेंडा घेऊन त्याचे पुढे चालणे असो की मग त्या ठिकाणची माहिती सांगणं असो. आपल्या कामाशी एकनिष्ठ होता तो.... आम्ही टोकयो टॉवर, एम्परर पॅलेस आणि असामासि टेंपल ही तीन ठिकाणं पाहिली.

टोकियो टोवर वरून टोकियोचे दर्शन



टोकियो टोवर वरून टोकियोचे दर्शन



टोकयोचे आधीचे नाव होते “अकीयो” आणि बाशी म्हणजे ब्रिज. टोकयो मस्त आहे. मोठ्या मोठ्या इमारती, स्वच्छ परिसर, आणि आखीव रेखीव असे शहर. टोकयो टोवरच्या जवळच आता आणखीन एक टोवर बांधला जातोय. आइफेल टोवरला मागे टाकेल असा....खरं म्हणजे टोकयो टोवर हा संपर्कासाठी बांधला गेला. आम्ही साधारणतः १००० फुट वर गेलो. तिथून संपूर्ण टोकयोचे दर्शन होत होते. टोवर ची ऊंची आहे ३३३ मीटर्स. वरुन दिसणारे टोकयो खूप छान वाटते.

‘एंपरर पॅलेस’ च्या आसपास मोठा सुंदर बगीचा, पाईनचे वृक्ष, आणि महालात राहतात फक्त २ माणसं. राजा आणि राणी– सुरक्षा एकदम कडक. बगीच्यात हिंडलो कारण आत प्रवेशच नाही. केवळ गेट पाहून परत फिरायचे.

वर्षातून २ दिवस हा राजवाडा सगळ्यांसाठी खुला असतो. डिसेंबर मध्ये एक दिवस आणि २ जानेवारीला.



‘असामासि टेंपल’ जवळ खूप मोठे मार्केट आहे. तेथे चक्कर मारली आणि आम्ही निघालो. बसने आम्हाला ‘गिंझा’ स्टेशन जवळ सोडले. तेथून विलाफोंटेनला आम्ही चालत गेलो. १५ – २० मिनिटे चालायचे होते. आम्ही हॉटेलवर पोचलो. त्यांनी आणखी एक गोष्ट चांगली केली ती म्हणजे १३ तारखेची आमची लिमोझिन बसची तिकिटे आरक्षित केली होती, एयरपोर्ट ला जाण्यासाठीची. एरवी आम्हाला सामान घेऊन ट्रेन बदलून दगदग करत विमानतळावर पोचावे लागले असते. यामुळे रात्री शांत झोपलो. सकाळी ब्रेक फास्ट करून ८:१५ ला बस आली. हॉटेल पासून २ मिंनिटांवर स्टॉप होता. एकदम आरामशीर प्रवास. अगदी टर्मिनल १ च्या दारात उतरविले . ९: ४५ ला आम्ही विमानतळावर होतो. फ्लाइट होती ११:३० ची. नरिटा एयरपोर्ट वर थोडी चोकोलेट्स आणि इतर छोटी खरेदी केली आणि फ्लाइट मध्ये बसलो. ६ तासांची होती फ्लाइट. सिंगापूर एयरलाइन्सची सर्विस मस्त, खाणे-पिणे भरपूर आणि आरामदायी प्रवास.

संध्याकाळी ६ वाजता चांगी एयरपोर्ट ला उतरलो. सगळे सोपस्कार उरकून, एयरपोर्ट च्या बसने आमच्या हॉटेल वर पोचलो फक्त १८ सिंगापुर डॉलर्स मध्ये. हॉटेलचे नाव होते "रोबिन्सन क्वी". मुलाने आरक्षण करून ठेवले होते. आता बारीक बारीक पाऊस सुरू झाला होता. हॉटेल अगदी नदीवरच होते. पर्यटकांची गर्दीही होती आणि त्यात शनिवार संध्याकाळ. आत्तापर्यंतच्या रूम्सच्या मानाने ही हॉटेलची खोली लहान होती पण लोकेशन एकदम मस्त होते.

कारंजी



सिंगापूरला आल्यापासून आता गोऱ्या आणि चपट्या नाका बरोबरच शाम, काळी, सरळ नाकाची माणसे सुध्धा दिसू लागली होती. साडी नेसलेल्या स्त्रियाही दिसायला लागल्या होत्या. तमिळ भारतीयांनी सिंगापूरचे काही भाग व्यापून टाकले आहेत. जरासे उशीराच बाहेर पडलो, काहीतरी खाण्यासाठी. सगळीकडे दिव्यांची आरास, आणि गडबड..... तुळशीचे लग्न होते आज.



दिवाळीची आरास, सिंगापूर

आम्ही रिव्हर साईड्ने चालत निघालो परंतु कोठेही भारतीय खाणे मिळेना. चायनीज, आफ्रिकन, मेक्सिकन आणि अशी विविध प्रकारचे जेवण मिळणारी हॉटेल्स होती. खूप चाललो, तेव्हढ्यात आम्हाला एका बाईने 'रास' नावच्या हॉटेलची माहिती दिली. परदेशी माणसे पण खूप दिसत होती. ड्रिंक्स घेत, बियर घेत, माणसं काय डोसा खात बसणार की काय? अखेर आम्हाला ते रास हॉटेल सापडले, बटर चिकन आणि बटर नानही सापडले पण खूप महाग.... असो.. जेवलो आणि हॉटेलवर परतलो. १४ नोव्हेंबर, रविवार होता दुसरे दिवशी.... ब्रेकफास्ट घेतला आणि होटलच्या जवळच असलेल्या एम. टी. आर. ''क्लार्क्स की'' या स्टेशनवर जाऊन पास काढला. ट्रेन पकडून 'लिटल इंडिया' ला गेलो. तिथे उतरलो आणि काय, सिंगापूर सिंगापूर वाटेचना...... नुरच पालटलेला ...... तमिळ लोकांनी व्यापून टाकलेला भाग... तमिळ रेकॉर्ड्स लागलेल्या, उद्घोषणा तमिळ मधून, पाट्या त्याच भाषेत ... आणि खूप माणसं..... त्यामुळे साहजिकच सिंगापूर मध्ये इतर ठिकाणी दिसणारी स्वच्छता इथे दिसत नाही. आम्ही सरंगून रोडवरुन चालत निघालो. संपूर्ण रस्त्याला रोषणाई केली होती. आम्ही रस्त्यावर चक्कर मारली, 'मुस्ताफा' ((सोन्याचे दुकान) कडे गेलो, थोडी खरेदी केली, खाल्ले आणि

बारीक सारीक खरेदी करून ३ - ४ ला परतलो. आता पाहिजे ते खाणे मिळणार होते. आम्ही परतताना पार्सल घेऊन आलो होतो रात्रीसाठी. खूप हिंडणे झाले होते त्यामुळे पाय थोडे दुखत होते. परत बाहेर पडण्याची इच्छा नव्हती. या आधीच्या टूरमध्ये 'सेन्टोसा' 'जुरांग बर्ड पार्क' वगेरे पूर्ण पाहून झाले होते. हॉटेलवर आल्यावर भाचीला फोन केला. तिच्याकडे १७ तारखेला जायचे होते. फोनवर तिने खूप माहिती दिली. १५ तारखेला आम्ही युनिव्हर्सल स्टुडिओ पाहायला गेलो. सेन्तोंसा एक्स्प्रेसने तेथे पोचलो. मस्त अनुभव होता.

प्रगति म्हणजे काय हे लक्षात येते. तेथील सर्व राईड्स मध्ये बसलो. काही काही राईड्स तर एकदम भीतीदायक होत्या.



युनिव्हर्सल स्टुडीयो

प्रवेश द्वाराजवळील वृक्ष



ममीज लँडमधील अनुभव चक्रावणारा ..... आपण कुठे फेकलो जातोय की काय? अशी भीती वाटत होती. कासल हंट, वाटर किंगडम, न्यूयोर्क रोड, स्पेशियल इफ्फेक्ट्स हे सगळे पाहून विज्ञानाची कमाल वाटते. खूप मजा आली. परतायला ५:३० वाजले. दमायला झाले होते. मग संध्याकाळी कुठेच गेलो नाही.एक गोष्ट छान होती, हॉटेलची लोकेशन इतकी छान होती की बाहेर पडले की एकदम उत्साही वातावरण. १७ तारखेला सकाळी चायना टाउन ला गेलो, बाजारात हिंडलो, धोबी घाट स्टेशन बाहेरील प्लाझा सिंगापूर मधील 'डायझो' या २ डॉलर शॉपिंग मोल मध्ये गेलो. दुपारी २ वाजता भाची आमच्या स्टेशनला येणार होती. हॉटेलवर आलो आणि सामान ठेवून तिच्यासाठी आणलेल्या गिफ्ट्स घेतल्या आणि पुन्हा स्टेशनवर गेलो. ईस्ट- वेस्ट लाईनने आम्ही तिच्या बरोबर तिच्या घरी पोचलो. सर्वांशी छान गप्पा झाल्या. बाहेर पाऊस होता. १९ व्या मजल्यावरील घर मस्त आहे. तेथूनच जवळ असलेल्या आयकीया मध्ये गेलो. किरकोळ खरेदी करून परतलो आणि एकत्र जेवलो. कराओके वर गाणी ऐकली, म्हटली, मजा आली, छान वेळ गेला. आम्ही २००५ साली पण तिच्याकडे गेलो होतो. बसची चौकशी केली पण शेवटी टॅक्सी करूनच हॉटेलला आलो.


परतीचा प्रवास
6
5
4
17.11.2010 17:53

दुसऱ्या दिवशी म्हणजे १८ तारखेला आणखी एका ओळखीच्याकडे गेलो पण भेट झाली नाही. फोन नंबरच्या गोंधळामुळे चुकामुक झाली. आमची आज फ्लाईट होती परतीची. शेवटच्या दिवशी सविस्तर लिखाण झाले नाही म्हणून इतकेच .... आणि अखेर आम्ही मुंबईच्या गर्दीत परतलो ......

दुर्ग दुर्घट भारी

आसेतूहिमाचल

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या “मी पाहिलेला…” सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com